SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX-2609000 PGBUTR - 2609139
FAX +91-0231-2691533 & 2692333 website: www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४, महाराष्ट्र
दुरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2609000 पी.जी.बी.यु.टी.आर- 2609139
e-mail : directorbcud@unishivaji.ac.in, pgbutr@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क.:-एस.यु./पीजीबीयुटीआर/ब्रीज कोर्स/ 102 दिनांक : 3 JAN 2019

प्रति,

1) अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

2) प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- पीएच.डी. कोर्सच्या ब्रीज कोर्सबाबत.

संदर्भ :- शिवाजी वि./पीजीबीयुटीआर/2114 दि.14/7/2011 चे पत्र.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात (युजीसी, नवी दिल्ली यांनी दिलेल्या 2009 च्या निर्देशानुसार) आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की,

1. एम.फिल. थेअरी परिक्षा जुन्या अभ्यासक्रमानुसार पूर्ण करून पीएच.डी. साठी (2009-10 पासून) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ब्रीज कोर्स पूर्ण करणे आवश्यक आहे.
2. जे विद्यार्थी सुधारित कोर्सवर्कप्रमाणे मे 2012 पासून सुरू झालेली एम.फिल./पीएच.डी. कोर्स वर्क पूर्ण करतील त्यांना ब्रीज कोर्सची आवश्यकता नाही.
3. पीएच.डी. साठी नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी एम.फिल. थेअरी / प्री-पीएच.डी. परिक्षा जुन्या अभ्यासक्रमानुसार दिली असेल अशा पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना ब्रीज कोर्स करणे आवश्यक आहे. तरी अद्यापि ज्या विद्यार्थ्यांनी ब्रीज कोर्स पूर्ण केलेला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी-मार्च 2019 मध्ये होणारा ब्रीज कोर्स पूर्ण करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना ब्रीज कोर्स करणे आवश्यक आहे, अशा विद्यार्थ्यांनी ब्रीज कोर्स पूर्ण केला नसेल तर त्या विद्यार्थ्यांचे पीएच.डी. चे साध्या बांधणीमधील शोधप्रबंध स्विकारले जाणार नाहीत, याची संबधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
4. सर्व अधिविभागप्रमुखांनी/प्राचार्यांनी आपल्या विभागामधील / महाविद्यालयामधील पीएच.डी.च्या ज्या विद्यार्थ्यांनी ब्रीज कोर्स केलेला नाही अशा विद्यार्थ्यांशी संपर्क साधून, त्यांना ब्रीज कोर्स पुर्ण करणेबाबत सूचना द्याव्यात.
5. ब्रीज कोर्सचे आयोजन हे ज्या-त्या अधिविभागाने करावयाचे आहे. (शिवाजी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर ब्रीज कोर्स फॉर्म व हमीपत्र ठेवणेत आलेले आहे.)
6. दि.5 जानेवारी 2019 ते 20 जानेवारी 2019 पर्यत ब्रीज कोर्सचे विहित नमुन्यातील अर्ज हे ज्या त्या अधिविभागाने स्विकारावेत. ब्रीज कोर्सकरिता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या नावासह व पीएच.डी. नोंदणीच्या तारखेसह फक्त यादी पीजीबीयुटीआर विभागास दि.25 जानेवारी 2019 पर्यत देणेत यावी.
7. फेब्रुवारी-मार्च 2019 मध्ये प्रत्येकी 25 गुणांचे Quantitative Techniques व Computer Application असे प्रत्येकी 15 कॉन्टॅक्ट सेशनचे आयोजन ज्या-त्या अधिविभागाने करून त्यानंतर ब्रीज कोर्सची एकुण 50 गुणांची परीक्षा घ्यावी.
8. परीक्षेचे वेळापत्रक कार्यालयाच्या मान्यतेस या विभागास पाठवावे. सदर परीक्षेचा निकाल जाहीर करून त्याची प्रत या विभागास पाठवावी.
9. ब्रीज कोर्स उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका उत्तीर्ण / अनुत्तीर्ण शेऱ्यासह देण्यात यावीत.
10. सदरचे परिपत्रक सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.
11. शिवाजी वि./पीजीबीयुटीआर/2114 नुसार दि.14/7/2011 रोजी सर्व अधिविभागांना /महाविद्यालयांना ब्रीज कोर्सची नियमावली पाठविणेत आलेली होती. अधिक माहितीसाठी सदरची नियमावली पहावी.

आपली विश्वासु,

उपकुलसचिव

सोबत -

1) ब्रीज कोर्स साठीचा विहित नमुन्यामधील फॉर्म व त्याबाबतचे अंडरटेकींग जोडले आहे.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Application form for admission of the Ph.D. Bridge Course as per the U.G.C. regulation on minimum standards and procedure for awards of M.Phil./Ph.D. degree regulation 2009.

To,
The Director,
Board of College and University Development,
Shivaji University, Vidyanagar,
Kolhapur .

Sir,

I have admitted as a research student for Ph.D. in the subject ______________________ .

I hereby apply for admission to the Bridge Course work in ____________ (Subject) under the faculty of ________________________ of the Shivaji University, Kolhapur.

My detail information is on follows:-

1. Name in full (in English) : Shri./Smt. ________________________________
   (Beginning with surname in capital letter)
   (in Devnagari) ________________________________
2. Date of Registration ________________________________
3. Present address : ________________________________
   ____
   ____
   Telephone No. / Cell No.: ____________________ Email : ____________________
4. Whether belongs to SC/ST/VJ-NT/OBC/Handicapped etc : ____________________
5. Only for foreign student
   (a) Period of Visa : ________________________________
   (b) No Objection Certificate from the concerned Embassy : Yes / No

UNDERTAKING

I the undersigned Shri./Smt. ________________________________ is hereby state that, I will complete successfully the Bridge Course in fulfillment of the compliances of the UGC letter regarding standard and procedure, July 2009 and submit the result marksheet of the course work in due course of time.

Also, I am aware of the fact that unless I submit the result/marksheet/passing certificate of Bridge Course-work, my open defence shall not be conducted.

Name & Signature
of the Research Student

Signature of the HOD
with stamp

Name & Signature
of the Research Guide

जा.क्र. शिवाजी विद्यापीठ/पीजीबीयुटिआर/2114 दिनांक :- 14/7/2011

ब्रीजकोर्स नियमावली

युजीसी, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार एम.फिल./पी.एचडी या दोन्ही अभ्यासक्रमांच्या कोर्सवर्ककरिता सुधारित अभ्यासक्रम तयार करण्याची प्रक्रिया विविध अधिविभागामार्फत सुरू करण्यात आली होती. तथापि, ३१ ऑगस्ट, २०१० रोजी सर्व विद्यापीठ अधिकार मंडळांची मुदत संपुष्टात आल्याने सदरचे सुधारित अभ्यासक्रम संबंधित अधिकार मंडळाच्या मान्यतेचे लागू करणेबाबतची प्रक्रिया पूर्ण होवू शकली नाही.

i- शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ मधील एम.फिल./पी.एचडी करीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता पूर्वीचाच थेअरी अभ्यासक्रम लागू असल्याने त्याप्रमाणे अध्यापन पूर्ण करण्याबाबत सर्व अधिविभागांना कळविण्यात आले आहे.

ii- तथापि युजीसी यांच्या नविन धोरणानुसार एम.फिल./पी.एचडी करीता Research Methodology या पेपरमध्ये Quantitative Techniques & Computer Application यांचा समावेश आहे. तेव्हा, Research Methodology या पेपरमधील पहिले दोन युनिट हे अनुक्रमे Quantitative Techniques & Computer Application वर आधारीत असणे आवश्यक आहे.

iii- तेव्हा युजीसी, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार वरील धोरण राबविणे आवश्यक असल्याने खालील प्रमाणे Research Methodology या पेपरमधील Quantitative Techniques & Computer Application हे दोन Modules पूर्ण करणे संबंधित विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे.

iv- तेव्हा वरील अनुक्रमांक २ ते ३ येथील बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २००९-२०१० व २०१०-११ मधील एम.फिल./पी.एच.डी करीता प्रवेशित विद्यार्थ्यांच्या एम.फिल./पीएच.डी कोर्सवर्क करीता Computer Application & Quantitative Techniques चा सर्व विद्याशाखांतर्गत अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून त्यास ब्रीज असे संबोधण्यात येवून सदर बाबत नियमावली खालीलप्रमाणे राहील.

1) एम.फिल./पीएच.डी करिता Computer Application & Quantitative Techniques संदर्भातील ब्रिज कोर्सची परीक्षा अधिविभागीय पातळीवर राहील. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप Multiple Choice Question Based राहील. या परीक्षेमध्ये संबंधित विद्यार्थी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

2) या परीक्षेकरिता एकूण ५० गुणांची परीक्षा घेण्यात येईल.

3) एकूण 50 गुणांपैकी किमान २० किंवा २० पेक्षा अधिक गुण प्राप्त केल्यास उत्तीर्ण स्टॅन्डर्ड ऑफ पासिंग ठरविण्यात आले आहे.

v- वरीलप्रमाणे ब्रिज कोर्स पूर्ण करून घेण्याकरिता सर्व संबंधित अधिविभागांनी एकूण ३० कॉन्टॅक्ट सेशनच्या माध्यमातून प्रक्रिया पूर्ण करणेची आहे.

vi- जून 2009 नंतर (शैक्षणिक वर्ष २००९ - २०१०) एम.फिल. अभ्यासक्रमात प्रवेश घेवून पूर्वीच्याच अभ्यासक्रमानुसार एम.फिल. थेअरी परीक्षा उत्तीर्ण झालेले किंवा एम.फिल.पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी वर अनुक्रमांक ४ मध्ये नमूद केलेला ब्रिजकोर्स पूर्ण करणे बंधनकारक आहे. शैक्षणिक वर्ष २०१० - ११ मध्ये एम.फिल अभ्यासक्रमात प्रवेश घेवून पूर्वीच्याच अभ्यासक्रमानुसार एम.फिल थेअरी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा ब्रिजकोर्स पूर्ण करणे बंधनकारक राहील.

vii- पीएच.डी कोर्सकरीता प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांनी जुन्या अभ्यासक्रमानुसार (युजीसी नोटिफिकेशन येण्यापूर्वी) एम.फिल. पदवी प्राप्त केली असेल किंवा एम.फिल. थेअरी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत अशा विद्यार्थ्यांसाठीही सदर ब्रिज कोर्स पूर्ण करणे बंधनकारक आहे.

viii- वरील सर्व विद्यार्थ्यांकरीता युजीसी, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार वर नमूद केलेप्रमाणे पी.एचडी कोर्सवर्क मधील Research Methodology मधील पहिले दोन Modules म्हणजेच Quantitative Techniques & Computer Application हा भाग एम.फिल डिझरटेशन सादर करण्यापूर्वी किंवा पीएच.डी Thesis submit करण्यापूर्वी पूर्ण करणे अनिवार्य राहील.

संचालक,
(महाविद्यालये व विद्यापीठ
विकास मंडळ)